( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

मुंबई उच्च न्यायलातील  दिवाणी अपिलीय अधिकारिता

प्रथम अपील क्र. 143/2023

सह

अंतरिम अर्ज क्र. 1375/2023

मेसर्स गंगोत्री डेव्हलपर्स,
नोंदणीकृत भागीदारी कंपनी
मुख्यालय पोस्ट बारमेचा टायर,
घर  नं. 40, मार्केट यार्ड,शिरूर,  पुणे.

श्री गुलाब दिना धावडे,
(मयताचे वारस)
सौ. संगीता हनुमंत नाझीरकर
वय–४२ वर्षे, व्यवसाय– शेती आणि व्यापार,
रा. –२६, स्वप्न  शिल्प, कोथरूड पुणे–४११ ०३८  ....  अपीलकर्ते/अर्जदार (मूळ वादी)

विरुद्ध

श्री. अजित अनंतराव बुट्टे पाटील, वय–
४७ वर्षे,  व्यवसाय– शेती आणि व्यापार,
रा.  राज पॅलेस, ८६२, भांडारकर रोड,
पुणे–४११ ००४.

श्री अभयकुमार किसनदास बारमेचा,
वय–४३ वर्षे,  व्यवसाय– शेती आणि व्यापार,
रा. बारमेचा टायर, घर  क्र. ४०, मार्केट यार्ड, शिरुर, जि.  पुणे.



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



सौ. सविता राजाराम घावटे,
वय–३५ वर्षे, व्यवसाय– शेती आणि व्यापार,
रा. घोडनाडी, तालुका शिरुर, जि. पुणे.

श्री राहुल बाबूराव पाचारणे,
वय–28 वर्षे, व्यवसाय– शेती आणि व्यापार,
रा. 10, मंगलदास रोड, हार्म्स क्रिस्टल सोसायटी,
शिवदर्शन, पुणे 411001.

श्री मधुकर विठोबा भारणे
वय–50 वर्षे,व्यवसाय – शेती व व्यापार,
रा. अंथर्न, तालुका इंदापूर, जि. पुणे
उत्तरवादी (उत्तरवादी क्रमांक 1 ते 4 हे उत्तरवादी आहेत, तर उत्तरवादी क्रमांक 5 हा मूळ... वादी क्रमांक 2 आहे)

अर्जदार/अपीलकर्त्यांचे वकील कु. माधवी अयप्पा, तळेकर आणि सहकारी यांचे निर्देशावरून
श्री. अनिल साखरे, ज्येष्ठ वकील विवेक व्ही. साळुंके यांचे निर्देशावरून
श्री. शुभम बुधवंत, उत्तरार्थी क्र. 1 यांचे करिता वकील
श्री. चेतन पाटील, उत्तरार्थी क्र. 2 ते 4 यांचे करिता वकील

----

**न्यायपीठ : न्यायमूर्ती के. आर. श्रीराम आणि**
**न्यायमूर्ती राजेश एस. पटेल**
**दिनांकः 14 मार्च 2023**

----



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

**मौखिक न्यायनिर्णय (द्वारे न्यायमूर्ती के. आर. श्रीराम )**

१. अपिलार्थींनी अतिरिक्त न्यायाधीश, लघुवाद न्यायालय पुणे यांच्या दिवाणी व्यवहार संहिता आदेश ७ नियम ११ (डी) अन्वये वादपत्र फेटाळून लावण्याचा दिनांक १६ जानेवारी २०२१ च्या आदेशाला आव्हानीत केले आहे. संपरीक्षा न्यायालय या निष्कर्षाला पोहोचले की, वादीची पेढी मे. गंगोत्री डेव्हलपर्स भागीदारी संस्थांचे निबांधकाच्या अभिलेखामध्ये अस्तित्वात नव्हती आणि वादी क्रमांक १ आणि २ यांचा उल्लेख वाद दाखल होण्याच्या दिनांकावर भागीदारी संस्थांच्या नोंदवहीत भागीदार म्हणून होता हे दाखविणारा कोणताही दस्तऐवज वादींनी दाखल केला नाही त्यामुळे भारतीय भागीदारी कायदा १९३२ च्या कलम ६९ च्या तरतुदी नुसार दावा मुदत बाह्य ठरला आहे.

२. प्रस्तुत अपील ॲडमिशनसाठी अधिसूचित झाले होते. वादमुद्दा हा लघु स्वरूपाचा असल्याने अर्थात दि. व्य. सं. आदेश ७ निशाणी ११ (डी) अन्वये वादपत्र हे अस्तित्त्वातील कायद्यान्वये अवरुद्ध असल्याने संक्षिप्तरित्या फेटाळू शकते का? असा असल्याने उभय पक्षांच्या संमतीने आम्ही प्रस्तुत अपील हे ॲडमिशन टप्प्यावर अंतिम सुनावणीसाठी ऐकण्याचा निर्णय घेतला आहे.

३. दिवाणी व्यवहार संहिता आदेश ७ नियम ११ च्या तरतुदींबाबतचा कायदा सुनिश्चित आहे. आदेश ७ नियम ११ अन्वये वादपत्र फेटाळून लावण्याच्या अर्जावर केवळ तेंव्हाच विचार करता येईल जर दावा हा अंमलात असलेल्या कुठल्याही कायद्यान्वये मुदत बाह्य ठरत असल्याचे वादपत्र प्रथमदर्शनी उघड करत असेल, न की वादपत्राच्या उत्तरादाखल प्रतिवादीने अभिलेखावर आणण्याच्या बाबींचा उल्लेख केल्याने जर प्रतिवादीला या प्रकरणात घडल्याप्रमाणे वादपत्र सोडून इतर कुठल्याही बाबींचा उल्लेख करणे आवश्यक असल्यास तसे करणे हे वाद मुद्दे निश्चित झाल्यानंतर पुरावा देऊन आणि दावा हा



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
सत्यमेव जयते



टिकून राहण्याजोगा नसल्याबाबत न्यायालयाचे समाधान केल्यानंतरच असे करण्यास अनुज्ञेय ठरते. मात्र अशी कृती दिवाणी व्यवहार संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये करता येत नाही. न्यायालयांनी असे अधिनिर्णित केले आहे की, प्रतिवादीकडे असलेल्या अशा कोणत्याही बाबी ज्याद्वारे दावा चालविण्यायोग्य नसल्याचे सिद्ध करता येईल, या दिवाणी व्यवहार संहिता आदेश ७ नियम ११ (ड) च्या शक्तीचा वापर करून वादीचा दावा अयोग्य ठरविण्याचा आधार होऊ शकत नाहीत. अशा बाबींच्या आधारे दिलासा मिळविण्यासाठी प्रतिवादींना अशा बाबी कायद्याच्या तरतुदीनुसार अभिलेखावर आणण्यासाठी आवश्यक तो पुरावा द्यावाच लागेल आणि तसे केल्यानंतरच उत्तरार्थींनी दावा चालविण्यास योग्य नसल्याच्या आक्षेपावर न्यायालय योग्य तो निर्णय होऊ शकेल.

४. वादी क्रमांक १ आणि वादी क्रमांक २ हे गंगोत्री डेव्हलपर्स या नोंदणीकृत भागीदारी संस्थेचे भागीदार आहेत या आधारावर दावा दाखल केला होती. वादपत्राच्या परिच्छेद ४ मध्ये वादींचा ते भागीदार असल्याचा दाव्याला आधार देणारी कथने असून भागीदारी संस्था निबंधकांना माहिती देण्यात आली होती अशी सकारात्मक कथने असून सद्य स्थितीत जेव्हा दावा दाखल करण्यात आला वादी क्रं १ व २ हे वादी पेढीचे भागीदार म्हणून अस्तित्वात होते. वादपत्रात असेही कथन करण्यात आले आहे कि, दि. ३१/१२/२००९ पासून वादी संस्थेत भागीदार क्र. १ व २ असे दोन भागीदार होते व भागीदार क्र. २ चा मृत्यू झाल्यानंतर वादी क्र २ (अ) यांस भागीदार म्हणून समाविष्ट करण्यात आले. सद्याचा वाद हा पेढीच्या लेखे आणि घोषणे संबंधी आहे.

वादीचे म्हणणे असे आहे की, भागीदारी संस्थेचा तत्कालीन भागीदार असलेल्या प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचेशी संगनमत करून वादीच्या माघारी प्रस्तुत दावा दाखल केला होता



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



आणि जरी भागीदारी पेढीस दाव्यात प्रतिवादी क्र. १ असे दाखविले असले तरी समन्स भागीदार पेढीच्या नवे कधीही बजावण्यात आले नसून एक संमतीनामा घेण्यात आला ज्याच्या आधारे प्रतिवादींनी भागीदारी पेढीच्या मालमत्ता बळकावल्या आहेत.

५. सबब, विशेष दिवाणी दावा क्र. ६०७/२०१४ हा बनावट हुकूमनामा घोषित करण्यासाठी आणि रद्द करण्यासाठी किंवा बाजूला सारण्यासाठी दाखल करण्यात आला होता. तसेच प्रतिवादींच्या विरोधात कायम मनाई हुकूम यश मिळविण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

६. दि. व्य. सं. आदेश ७ निशाणी ११ अन्वये बाहेर काढण्यात आलेला अर्ज विचारात घेतला असता संपरीक्षण न्यायालयाने केवळ वादपत्रच विचारात घेतले नाही तर प्रतिवादींनीं अभिलेखावर आणलेल्या विविध बाबी लक्षात घेतल्या आहेत. दि. व्य. सं. आदेश ७ निशाणी ११ अन्वये करण्यात आलेल्या अर्जावर सुनावणी घेताना संपरीक्षण न्यायालयाने वादींना, वादी क्र. १ व २(अ ) हे गंगोत्री डेव्हलपर्सचे भागीदार आहेत हे सिध्द करण्यासाठी पाचारण केले होते. वादींनी ते नोंदणीकृत संस्थेचे भागीदार असल्याबाबतचे कुठलेही पुरावे दाखल न केल्याने आणि त्यांची नावे भागीदारी पेढीच्या नोंदवहीत आढळून न आल्याने संपरीक्षण न्यायालयाने दावा चालू ठेवला. कु. अय्यप्पा यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने पवनकुमार वि. बाबुलाल (मयत) कायदेशीर वारस आणि इतर (2019) 4 ssc 367 या प्रकरणातील निर्णयावर भर दिला असून कु. अय्यप्पा यांनी असे प्रतिपादन केले कि, जो पर्यंत प्रथमदर्शनी वादपत्र हे कोणत्याही अधिनियमान्वये चालवण्यास अवरुद्ध (Barred) असल्याचे दिसत नाही, कोणतेही न्यायालय दि. व्य. सं. आदेश ७ निशाणी ११ च्या तरतुदींचा वापर करून वादपत्र फेटाळू शकत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने असे अनुमान काढले आहे की, न्यायालयांचा दृष्टिकोन कायदेशीर



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



हरकतीच्या आधारावर प्रकरण पुढे चालविण्याचा आणि वादपत्रातील कथने मान्य केल्यास दावा हा एखाद्या संविधी अन्वये अवरुद्ध होतो किंवा नाही हे पाहण्याचा असणे आवश्यक आहे. दि. व्य. सं. आदेश ७ निशाणी ११ खालील अर्ज विचारात घेतला असताना वादग्रस्त प्रश्नांवर निर्णय देता येत नाही आणि हे केवळ अशाच प्रकरणावर लागू होते ज्यावर वादींनी वादपत्रात केलेली विधाने हि निःसंशयपणे किंवा निर्वीवादितपणे अस्तित्वात असलेल्या कुठल्याही कायद्यान्वये दावा हा अवरुद्ध झाल्याचे दर्शवितात. कु. अय्यप्पा यांनी भर दिलेल्या उज्वलाबेन शाह आणि इतर  वि. मेसर्स केशरचंद गुलाबचंद आणि इतर २००२(१) Mh.L.J. ३७८ या प्रकरणात जे की प्रस्तुत प्रकरणासारखी तथ्ये असलेल्या प्रकरण विचारात घेता या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायधीशांनी असे अनुमान काढले आहे कि, एखादी भागीदारी पेढी हि भागीदारी संस्थानच्या निबंधकाकडे नोंदविलेली आहे अथवा नाही हा वाद केवळ कायद्याचा प्रश्न असतो. एखादी संस्था हि नोंदणीकृत आहे किंवा नाही हे त्याबाबतीत आवश्यक पुरावा देऊनच सिध्द करावयाचे असते.  हा न्यायाधिकाराचा प्रश्न नसून दावा चालविण्या योग्य आहे का या बाबतचा आहे.

७.     कुमारी अय्यप्पा यांनी हाजींदरपालसिंव्ह विरुद्ध नरेंद्र कुमार नांगीया (2018 SSC online SC 1537) या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णययावर भर दिलेला आहे. ज्यात जिथे वाद मुद्दा  हा विधी आणि तथ्यांचा संमिश्र प्रश्न असतो तिथे पुरावा देण्याची आवश्यकता असते आणि दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ लागू होत नाही असे निरीक्षण नोंदविले आहे.

आर. के. रोजा  विरुद्ध यू. एस. रायूडू ((2016)14 SSC 275) प्रकरणात,  ज्यावर कुमारी अय्यप्पा यांनी भर दिला आहे, मा. सर्वोच्च न्यायालयाने  न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये असे म्हटले आहे की ,



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



*"उच्च न्यायालयाने आक्षेपित आदेशात घेतलेली भूमिका मान्य करण्यासारखी नाही. दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ खाली अर्ज दाव्याच्या कुठल्याही टप्प्यावर करता येऊ शकतो, जे की या न्यायालयाने सोपान सुखदेव साबळे विरुद्ध चॅरिटी कमिशनर प्रकरणात (एस.सी.सी. पृष्ठ १४६ परिच्छेद १०) नोंदविलेले आहे.*

*१०. संपरीक्षण न्यायालय या शक्तीचा वापर दाव्याच्या कुठल्याही टप्प्यावर – वादपत्राची नोंदणी करण्याआधी किंवा प्रतिवादीला संपरीक्षा पूर्ण होण्याआधी कुठल्याही वेळी समन्स जारी केल्यानंतर – करू शकते. एकच बंधन याबाबतीत आहे ते, म्हणजे, वादपत्र फेटाळण्याचा निर्णय हा प्रतिवादीने आपल्या लेखी कैफियतीत केलेल्या आरोपांच्या आधारावर घेतलेला किंवा वादपत्र फेटाळण्यात यावे यासाठी केलेल्या अर्जातील आरोपांच्याआधारे घेतलेला नसावा. संपरीक्षा न्यायालयाने वादपत्राचा साकल्याने विचार करावा आणि जर संपूर्ण वादपत्र दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ (ए) ते (एफ) मध्ये समाविष्ठ परिस्थितींनुसार असल्यास असे वादपत्रं फेटाळले जाणे आवश्यक ठरते.*

*(भर दिला. )"*

८ कु.अय्यप्पा यांनी भर दिलेल्या शिवरुद्र शिवलिंग पैलवान विरुद्ध प्रकाश महारुद्र पैलवान ((2003) 1 Mh.L.J. 299) या प्रकरणांत या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी असे अनुमान काढले आहे की, दावा अवरुद्ध आहे या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यास न्यायालयास सक्षम करण्यासाठी वादीने दाखल केलेल्या दाव्यात वादपत्रातील वादकथनांनी दाव्यास रोध करणारी तथ्ये



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



सकृतदर्शनीच उघड केलेली असावीत.दाव्यास रोध करणारी निष्कर्ष हे वादपत्राती कथनांच्या बाहेर असलेल्या बाबींच्या आधारावर काढता येणार नाहीत. न्यायालयाने असाही निर्णय काढला आहे की, दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ (ड) अन्वये न्यायालयाचे अधिकार क्षेत्राचा वापर अशाच प्रकरणात करता येईल जिथे वादपत्रातील कथनेच दाव्याला असलेला अवरोध स्पष्ट करण्यास पुरेशी आहेत, अन्यथा नाही.

९. श्रीराम फायनान्स कॉर्पोरेशन वि. यासीन खान आणि इतर (1989 Mh.L.J 849) यांच्या याचिकेवर अवलंबून प्रतिवादीचे वकील श्री साखरे यांनी सांगितले की भागीदारी कायद्याच्या कलम ६९ (२) च्या तरतुदींनुसार सदर वाद चालविण्यायोग्य नव्हता. सदर दाव्यामधील तथ्यांवर हा न्यायनिर्णय लागू न होण्याची दोन करणे आहेत जे की, अ ) संपरीक्षण न्यायालयाने भागीदारी अधिनियाच्या कलाम ६९ (१) च्या तरतुदी लागू केल्या कारण वाद हा भागीदारांमधील/ तत्कालीन भागीदरांमधील आहे आणि ब )हे प्रकार असे नव्हते ज्यात दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ लागू होणे विचारात घेतले गेले.

१०. अल्ताफ फकीर बेग आणि इतर वि. गोयल गंगा डेव्हलपर्स (इंड) प्रा. ली. (Dated 10.01.2023 in First Appeal (St.) No. 18751 of 2021) प्रकरणात, आपण लक्षात घ्यावे की, दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ अन्वये न्यायालयाला अतिशय व्यापक शक्ती दिलेल्या आहेत, अशा शक्ती वापरण्याच्या पूर्वअटी या खास करून कायद्यानुसार अवरोहाच्या आधारावर वादपत्र फेटाळण्याचा बाबतीत कठोर आहेत. त्यामुळे जेव्हा वादी दावा करतो की भागीदारी संस्था हि नोंदणीकृत भागीदारी संस्था आहे, या टप्प्यावर हे कथन दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ७ नियम ११ चा वापर लक्षात



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY


घेता मान्य केलेच पाहिजे, असे निरीक्षण न्यायालयाने न्यायनिर्णयाच्या परिच्छेद १२ आणि १३ मध्ये नोंदविले आहे.

११. सध्याच्या प्रकरणात संपरिक्षण न्यायालयाने कायदेशीर हरकतींच्या आधारावर प्रकरण पुढे चालू ठेवले नाही, तर सदर वादपत्राच्या कथनातील बाह्य बाबींच्या आधारावर सदर दावा अवरुद्ध करण्यात आला आहे. मुद्दा असा आहे की, सदरची पेढी ही नोंदणीकृत आहे अगर कसे हा कायदे व तथ्यांचा समिश्र प्रश्न असून त्यासंदर्भात आवश्यक ते पुरावे सादर करण्यात यावेत. या परिस्थितीत आम्ही वादपत्र नकारण्याचा संपरीक्षा न्यायालयाने पारित केलेला आव्हानीत आदेश बाजूला सारला आहे. अपील मान्य करण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे.

१२. सदरचा दावा संपरीक्षा न्यायलयात दाखल करण्यासाठी पुनर्स्थापित करण्यात आला आहे.२०१४ पासून सदर दावा प्रलंबित आहे. त्यामुळे आम्ही संपरीक्षा न्यायालयास असे निर्देश देत आहोत की, सदरचा प्रलंबित खटला कोणत्याही परिस्थितीत सहा महिन्यांच्या आत त्वरित निकाली काढण्यात यावा.

१३. संपरीक्षा न्यायालय या प्रकरणातीळ गुण–दोषांचा स्वतंत्रपणे विचारात घेईल आणि प्रकरण निकाली काढेल.

१४. कु. अय्यप्पा यांनी खर्चाच्या मागणीवर भर दिला आहे. त्यांची हि मागणी न्यायोचित आहे. या अपिलाचा खर्च म्हणून प्रतिवादींना 1,00,000/– रुपये द्यावे लागतील.अपीलकर्त्यांच्या वकिलांना



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



आजपासून चार आठवड्यांच्या आत खर्चाची रक्कम देण्यात यावी रक्कम न भरल्यास संपरिक्षण न्यायालयाने प्रतिवादींचा बचाव रद्द करावा

१५. परिणामी, अंतरिम अर्ज देखील निकाली काढण्यात आला आहे.

(न्यायमूर्ती, राजेश पाटील) (न्यायमूर्ती, के. आर. श्रीराम,)

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.



::: Uploaded on - 17/03/2023 ::: Downloaded on - 27/03/2023 16:17:18 :::